I.I.F.-I (एकीकृत अन्न वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** गोंदिया शहर **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0844 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/10/2026 17:16 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 09/10/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 13/10/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:51 तास **Time To (वेळेपर्यंत):** 09:55 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 13/10/2026 **Time (वेळ):** 17:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 059 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 13/10/2026 17:16 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आरोपी यांचे राहते घरी, घरी श्री रामेश्वर कटरे यांच्य, राधाकृष्ण कॉलनी छोटा गोंदिया,गोंदिया

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):** गोंदिया शहर

**District (State) (जिल्हा (राज्य)):** गोंदिया (महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अरविंद पुंडलिक राऊत

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

1988

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | POLICE HEAD QUERTER, ROAD, POLICE LINE, TUKUM CHANDRAPUR, CHANDRAPUR, CHANDRAPUR, रामनगर, चंद्रपुर, महाराष्ट्र-442401, भारत |
| 2 | वर्तमान पता | A c bगोंदिया, A c bगोंदिया, A c bगोंदिया, गोंदिया, गोंदिया शहर, गोंदिया, महाराष्ट्र-442401, भारत |
| 3 | स्थायी पता | A c bगोंदिया, A c bगोंदिया, A c bगोंदिया, गोंदिया, गोंदिया शहर, गोंदिया, महाराष्ट्र-442401, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8669152138

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामचंद्र ज्ञानराम मोटघरे | | | 1. राधाकृष्ण कॉलनी छोटा गोंदिया,Town/Village (शहर / गाव): राधाकृष्ण कॉलनी छोटा गोंदिया,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया शहर,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | कु. उषा जयकृष्ण पाटील | | | 1. राधाकृष्ण कॉलनी छोटा गोंदिया,Town/Village (शहर / गाव): राधाकृष्ण कॉलनी छोटा गोंदिया,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया शहर,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | 02 विवो कंपनीचे जने वापरते मोबाईल फोन | 10,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ओडियो कॅसेट | 03 सन्डीश कंपनीचे 32 जी.बी.क्षमतेचे मेमरी कार्ड | 1.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्य यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | गुन्ह्यासंबधी कागदपत्रे | 1.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराचे 100 भारतीय चलनी नोटाआणी 500 रुपये छापीव अअसलेले चिल्ड्रन बँक नावाचे खेळण्याचे नोटा | 50,000.00 |
| 5 | इतर | घरगुती वस्तु | एक जुनी वापरती बेडशिट | 1.00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 60,003.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांक:- 13-10-2026

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया

नाव:- अरविंद पुंडलिक राउत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया मो. क्र.- 8275298475

आम्ही तर्फे फिर्याद देतो की, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहात. दिनांक 09-10-2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे आपल्या कक्षात बसून कार्यालयीन कामे करीत असताना वेळ 10-30 वा. सुमारास श्री. निलेश लोधी सर, पोलीस उपअधीक्षक यांनी आपल्या दालनात बोलावून सांगितले की, त्यांच्या समोर बसून असलेले व्यक्ती हे रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया असे असून त्यांनी ते माजी सैनिक असल्यामुळे शासनाच्या नियममानुसार, मौजा मानगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया येथे शासकीय जमीन मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता, त्यासंबंधी पुढच्या कार्यवाही करण्यासाठी ग्रामपंचायत मानगावचे ग्रामपंचायत

सचिव श्रीमती उषा पाटील ह्या लाचेची मागणी करीत आहेत अशी तक्रार आहे असे सांगून त्यांची तक्रार नोंदवून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आदेशित करून मार्गदर्शन केले. यावरून तक्रारदार यांना आपल्या कक्षात नेऊन त्यांचे नाव, गाव व तक्रारीसंबंधी सविस्तर विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया असे सांगून त्यांनी कथन केलेली तक्रार त्यांना लिहून देण्यास सांगितली. तक्रारदार यांनी आपल्या स्वाक्षरीने लेखी तक्रार लिहून सादर केली ती खालीलप्रमाणे:

प्रति,

मा. पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया.

विषय:- ग्रामपंचायत मानगावचे ग्रामपंचायत सचिव श्रीमती उषा पाटील यांनी शासकीय काम करण्याकरिता लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार असून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबत.

अर्जदार:- रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया. मो.क्र.- 8669152138.

मा. महोदय,

सविस्तर विनंती अर्ज आहे की, मी रविकांत खुशाली खिल्लारी, माजी सैनिक असून रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया येथील रहिवासी आहे.

मी माजी सैनिक असल्यामुळे शासनाच्या नियममानुसार, मौजा मानगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया येथील गट क्रमांक 526 मधून 2 हेक्टर आर शासकीय जमीन मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे दिनांक 23-09-2025 रोजी प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी आवश्यक माहिती सादर करण्यासाठी तहसील कार्यालय, आमगाव यांना निर्देश दिले. त्यानुसार तहसीलदार, आमगाव यांनी संदर्भातील जमिनीबाबत ग्रामपंचायत मानगाव कडून ठराव मिळण्याबाबत तीन वेळा अधिकृत पत्रे पाठवली. मात्र, त्या पत्रांवर कोणतीही कार्यवाही न करता ग्रामपंचायतीचे सचिव श्रीमती उषा पाटील यांनी माझ्याकडून रु. 5,50,000/- (पाच लाख पन्नास हजार रुपये) लाचेची मागणी केली. तसेच, "तुम्ही आमचे काम करा, आम्ही तुमचे काम करतो" असे म्हणून काम सुरू करण्यासाठी माझ्याकडून रु. 50,000/- श्रीमती उषा पाटील यांनी घेतले व उर्वरित रक्कम नंतर आणून देण्याबाबत सांगितले होते. त्यानंतर दिनांक 08-10-2026 रोजी श्रीमती उषा पाटील यांचा मला दुपारी 14-53 वा. फोन आला आणि त्यांनी मला सांगितले की, तुमच्या कामाच्या व पैशांच्या संदर्भाने बोलायचे असून तुम्ही मला उद्या माझ्या घरी येऊन मला भेटवा असे सांगितले. यावरून माझी खात्री झाली की, श्रीमती उषा पाटील ह्या माझे काम करून देण्याकरिता उर्वरित लाचेच्या रकमांची बोलणी करण्यासाठी मला बोलावत आहेत. तरी मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही, परंतु मी त्यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम न दिल्यास ते माझे काम करणार नाहीत अथवा त्या कामात अडथळा निर्माण करतील.

श्रीमती उषा पाटील, ग्रामपंचायत सचिव, ग्रामपंचायत मानगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया या मागितल्यास रु. 5,00,000/- ही कायदेशीर फी नसून स्वतःकरिता लाच मागत असल्याने व त्यांना

सदरची लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने त्यांच्याविरुद्ध तक्रार देत आहे. त्यांच्यासोबत माझे आर्थिक व्यवहार तसेच जुनी वैमनस्य नाही. तरी त्यांच्याविरुद्ध कारवाई होण्यास विनंती आहे.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवर लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी मा. कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया यांना पत्र देऊन दोन शासकीय पंच श्री. मुकेश आनंदराव साहू, पद- संगणक व श्री. तुषार रमेश गभणे, कनिष्ठ लिपिक यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांना तक्रारदाराकडून लोकसेवकाविरूद्ध लाच मागणी संबंधी तक्रार नोंदविलेली असून त्या तक्रारीवर लाच मागणी पडताळणी and सापळा कार्यवाही करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून त्यांची संमती विचारली असता त्यांनी संमती दिल्याने श्री. तुषार रमेश गभणे यांना पंच क्र. 1 तर श्री. मुकेश आनंदराव साहू यांना पंच क्र. 2 म्हणून ठरविण्याचे आले.

सापळा पथकाचा तसेच तक्रारदार यांचा दोन्ही पंचांना परिचय करून देऊन यांची एका लोकसेवकाविरूद्ध लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे सांगून तक्रारदार यांची लिखित तक्रार दोन्ही पंचांना वाचकास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचून तक्रारदार यांनी कथन केल्याप्रमाणे असल्याने त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर आम्ही स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गैरअर्जदार श्रीमती उषा पाटील, ग्रामपंचायत सचिव यांना लाचेमध्ये देण्याकरिता रु. 5,00,000/- जमा करण्याबाबत सांगितले असता त्यांनी त्यांच्याकडे सध्या एवढी मोठी रक्कम जवळ नसल्याचे सांगितले. यावरून गैरअर्जदार यांच्याविरुद्धची लाच मागणी पडताळणी कार्यवाही झाल्यावर लाचेच्या मागणीप्रमाणे तक्रारदाराकडून रक्कम जमाफिर्याद

दिनांक:- 13-10-2026

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया

नाव:- अरविंद पुंडलिक राउत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया मो. क्र.- 8275298475

आम्ही तर्फे फिर्याद देतो की, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहात. दिनांक 09-10-2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे आपल्या कक्षात बसून कार्यालयीन कामे करीत असताना वेळ 10-30 वा. सुमारास श्री. निलेश लोधी सर, पोलीस उपअधीक्षक यांनी आपल्या दालनात बोलावून सांगितले की, त्यांच्या समोर बसून असलेले व्यक्ती हे रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया असे असून त्यांनी ते माजी सैनिक असल्यामुळे शासनाच्या नियममानुसार, मौजा मानगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया येथे शासकीय जमीन मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता, त्यासंबंधी पुढच्या कार्यवाही करण्यासाठी ग्रामपंचायत मानगावचे ग्रामपंचायत सचिव श्रीमती उषा पाटील ह्या लाचेची मागणी करीत आहेत अशी तक्रार आहे असे सांगून त्यांची तक्रार नोंदवून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत आदेशित करून मार्गदर्शन केले. यावरून तक्रारदार यांना आपल्या कक्षात नेऊन त्यांचे नाव, गाव व तक्रारीसंबंधी सविस्तर विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता.

देवरी, जि. गोंदिया असे सांगून त्यांनी कथन केलेली तक्रार त्यांना लिहून देण्यास सांगितली.

तक्रारदार यांनी आपल्या स्वाक्षरीने लेखी तक्रार लिहून सादर केली ती खालीलप्रमाणे:

प्रति,

मा. पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया.

विषय:- ग्रामपंचायत मानगावचे ग्रामपंचायत सचिव श्रीमती उषा पाटील यांनी शासकीय काम करण्याकरिता लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार असून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबत.

अर्जदार:- रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया. मो.क्र.- 8669152138.

मा. महोदय,

सविस्तर विनंती अर्ज आहे की, मी रविकांत खुशाली खिल्लारी, माजी सैनिक असून रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया येथील रहिवासी आहे.

मी माजी सैनिक असल्यामुळे शासनाच्या नियममानुसार, मौजा मानगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया येथील गट क्रमांक 526 मधून 2 हेक्टर आर शासकीय जमीन मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे दिनांक 23-09-2025 रोजी प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी आवश्यक माहिती सादर करण्यासाठी तहसील कार्यालय, आमगाव यांना निर्देश दिले. त्यानुसार तहसीलदार, आमगाव यांनी संदर्भातील जमिनीबाबत ग्रामपंचायत मानगाव कडून ठराव मिळण्याबाबत तीन वेळा अधिकृत पत्रे पाठवली. मात्र, त्या पत्रांवर कोणतीही कार्यवाही न करता ग्रामपंचायतीचे सचिव श्रीमती उषा पाटील यांनी माझ्याकडून रु. 5,50,000/- (पाच लाख पन्नास हजार रुपये) लाचेची मागणी केली. तसेच, "तुम्ही आमचे काम करा, आम्ही तुमचे काम करतो" असे म्हणून काम सुरू करण्यासाठी माझ्याकडून रु. 50,000/- श्रीमती उषा पाटील यांनी घेतले व उर्वरित रक्कम नंतर आणून करण्याचे सर्वानुमते ठरवले.

तक्रारदार व दोन्ही पंच यांना सदर कार्यवाहीमध्ये उपयोगणात येणारे अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट लैंप यांचे वैशिष्ट्ये समजवून सांगून पोलीस अंमलदार यांच्या मार्फत त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे सदर कार्यवाहीदरम्यान तक्रारदार व गैरअर्जदार लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण कार्यालयीन ८ हॉइस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये कशाप्रकारेत ध्वनिमुद्रित करण्यात येते यासंबंधाने ८ हॉइस रेकॉर्डर, मेमरीकार्ड बाबत माहिती देऊन त्याचे देखिल प्रात्यक्षिक पोलीस अंमलदार यांच्या मार्फत करून दाखविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार यांना गैरअर्जदार हे कुठे मिळतील? म्हणून विचारणा केली असता त्यांनी ते कधी गोंदिया येथे किंवा मानगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे शासकीय कामाने राहत असल्याने येण्यापूर्वी फोन करण्याचे सांगितले होते, त्यामुळे त्यांच्या मोबाईलवर फोन लावून विचारणा करावी लागेल असे सांगितल्याने कार्यालयीन डिजिटल ८ हॉइस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार यांना गैरअर्जदार यांच्याशी फोनवर त्यांच्या मोबाईलचे स्पीकर सुरू करून ते कुठे आहेत? याबाबबत विचारणा करण्याकरिता फोन लावण्याचे ठरवून गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांना बोलाविल्यामानुसार त्या

ठिकाणी पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर आमच्या सूचनावरून अधीनस्त कर्मचारी यांनी सुस्थितीत करून ठेवलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजिटल ८ हॉइस रेकॉर्डर ट्रीप सुटकेसमधून बाहेर काढले व वेळ12-51 वाजता सुरू करून पंच क्र. 1 व तक्रारदार यांच्या आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाहीकरिता जात असल्याबद्दलचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते ८ हॉइस रेकॉर्डर कापडी पिसाफर ठेवून तक्रारदार यांच्या गळ्यामध्ये शर्टच्या आत दोरीने लटकवून दिले आणि तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 8669152138 वरून गैरअर्जदार यांच्या मोबाईल 8999598944 क्रमांकावर मोबाईलचे स्पीकर सुरू करून गैरअर्जदार हे कुठे आहेत? याबाबबत माहिती घेण्यासाठी फोन लावण्यास सांगितले असता तक्रारदार यांनी फोन लावल्यावर गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचा फोन उचलला नाही. त्यामुळे तक्रारदार यांच्या गळ्यात असलेला ८ हॉइस रेकॉर्डर वेळ12-54 वाजता बंद केला. ८ हॉइस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मधली PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाइल 261009_1254.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून आले. ८ हॉइस रेकॉर्डर ट्रीप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवून दिला.

तक्रारदार हे कार्यालयात हजर असताना वेळ 13-08 वा. सुमारास गैरअर्जदार यांचा तक्रारदार यांना फोन आल्याचे तक्रारदार यांनी सांगितल्याने त्यांना त्यांच्या फोनचे स्पीकर सुरू करून बोलण्यास सांगितले. तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांच्याशी बोलणी केली असता गैरअर्जदार यांनी ते मीटिंगमध्ये असल्याने सायंकाकाळी 05-00 वा. सुमारास घरी गोंदिया येथे भेटण्यास ये असे सांगितले. त्यानंतर पुन्हा वेळ 16-57 वा. तक्रारदार यांच्या मोबाईलवर गैरअर्जदार यांचा फोन आल्यामुळे त्यांना मोबाईल फोनचे स्पीकर सुरू करून बोलणी करण्याबाबत सांगितले असता तक्रारदार यांनी बोलणी केली असता गैरअर्जदार यांनी त्यांना त्यांच्या घरी आले आहेत असे सांगून घरी येण्यास सांगितले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांना भेटण्यास त्यांच्या राहते घर छोटा गोंदिया येथे बोलाविल्याने तक्रारदार यांना पंच क्रमांक 1 यांस सह गैरअर्जदार यांच्या घरी लाच मागणी पडताळणी कार्यवाहीकरिता पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्यांना लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान घेण्याच्या दक्षतेबाबत सूचना सांगून पंच क्रमांक 1 यांच्या हस्ते तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंतर सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजिटल ८ हॉइस रेकॉर्डर ज्यामध्ये नवीन सेल व सँडिस्क कंपनीचा नवीन मेमरी कार्ड सिरियल क्र. 6242DFFKL09J चा टाकून सुस्थितीत करून असलेला वेळ 17-11 वाजता सुरू करून पंच क्र. 1 व तक्रारदार यांच्या आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाहीकरिता जात असल्याबद्दलचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते ८ हॉइस रेकॉर्डर कापडी पिसाफर ठेवून तक्रारदार यांच्या गळ्यामध्ये शर्टच्या आत दोरीने लटकवून दिले. तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांससह तक्रारदार यांच्या मो.सा. क्र. MH-35/AF4670 ने गैरअर्जदार यांच्याशी लाच मागणी संदर्भाने बोलणी करण्याकरिता गैरअर्जदार यांच्या राहते घर गोंदिया येथे पाठविण्यात आले. आम्ही पंच क्र. 2 व सापळा पथक कार्यालयच थांबून राहिलो.

गैरअर्जदार -

तक्रारदार हे गैरअर्जदार श्रीमती उषा पाटील यांच्याशी बोलणी करून पंच क्र. 1 यांससह ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथे परत आल्यावर त्यांच्या गळ्यात असलेले ८ हॉइस रेकॉर्डर बाहेर काढ्ल पंच क्र. 1 यांच्या आवाजात वेळ 18-23 वाजता बंद करण्यात आले. ८ हॉइस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड

मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाइल 261012_1711.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून आले. सदर फाइल मधील संभाषण दोन्ही पंचसमक्ष ऐकवले व दोन्ही पंकाना ऐकविल्यावर त्यांच्यात झालेल्या संभाषणावरून गैरअर्जदार श्रीमती उषा पाटील, ग्रामपंचायत सचिव, ग्रामपंचायत मानगाव यांनी तक्रारदार यांच्याकडे ते माजी सैनिक असल्याने त्यांनी शासनाकडून पाच एकर शेती मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांना सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भास ग्रामपंचायतचा ठराव घेऊन एनओसीचे कागदपत्र तयार करून देण्यासाठी ग्रामपंचायत संरपंच व सदस्य यांचे नाव घेऊन रु. 5,00,000/- लाचेची मागणी करून त्यातून पहिले स्वतःसाठी वेगळे रु. 1,00,000/- लाचेची मागणी करून ती लाच रक्कम सोमवारी स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याची आमची व दोन्ही पंकाची खात्री झाली. यावरून गैरअर्जदार यांच्याविरुद्धची सापळा कार्यवाही सोमवारी करण्याचे सर्वानुमते ठरवले.

लाच मागणी पडताळणीमध्ये गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांच्याकडे रु. 1,00,000/- लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांना लाच रक्कम रु. 1,00,000/- जमा करण्यास सांगितले. त्यावर त्यांनी त्यांच्याजवळ फक्त रु. 50,000/- असल्याचे सांगून त्यांच्या स्वतःच्या बचतीमधील रु. 50,000/- आणून आमच्याकडे जमा केली. उर्वरित रु. 50,000/- चिल्ड्रन्स बँकेच्या मुलांच्या खेळण्याचे रुपये वापरण्याचे सर्वानुमते ठरवून बाजारातून रु. 50,000/- चिल्ड्रन्स बँकेच्या मुलांच्या खेळण्याचे रुपये उपलब्ध करून घेतले.

तक्रारदार यांनी जमा केलेल्या 500/- रु. दरचे 100 चलन नोटा व 500 रु. दरच्या चिल्ड्रन्स बँकेच्या खेळण्याच्या 100 नोटा अशा एकूण 1,00,000/- रु. नोटांच्या क्रमांकाची वेगळी यादी तयार करून आमच्या सूचनावरून अधिनस्त कर्मचारी यांनी दोन्ही पंचसमक्ष आपल्या हाताच्या बोताने तक्रारदारkus लाच म्हणून द्यावयाकरिता हजर केलेल्या रु. 500/- दरचे 100 चलन नोटांना व 500 रु. दरच्या चिल्ड्रन्स बँकेच्या खेळण्याच्या 100 नोटांना दोन्ही बाजूस अँथ्रासिन पावडर लावून अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा एकूण रु. 1,00,000/- अशा ओरिजिनल नोटा एका कागदी लिफाफ्यात टाकून व खेळण्याच्या नोटा एका कागदी लिफाफ्यात टाकून त्या लिफाफ्यावर पंच व आमच्या सहीचे कागदी लेबल लावून पंचसमक्ष सील बंद करून ते लिफाफे ट्रीप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवून दिले. लाच मागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यातील झालेले ध्वनिमुद्रित संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून सहास परिशिष्ट-अ असे शीर्षक देण्यात आले. सदर संभाषण फाइलची हॅश ८ हॅल्व काढून सदरचे मेमरी कार्ड हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यात ठेवून त्यावर आम्ही व दोन्ही पंकाना सह्या करून तो लिफाफा कार्यालयीन सीलने सील बंद करून ट्रीप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवून दिला. यासंबंधरच्या सविस्तर नोंदी पंचानामा क्र.1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 09-10-2026 रोजी दिलेल्या सूचनाप्रमाणे दिनांक 12-10-2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पाथारधील सदस्य कार्यालयात हजर आहेत. तक्रारदार श्री रविकांत खिल्लारी हे त्यांना दिलेल्या सूचनाप्रमाणे 10-30 वा. कार्यालयात आल्यावर त्यांनी दोन्ही पंचसमक्ष सांगितले की, ते लाचलुचपत कार्यालयात येत असताना रस्त्यातच गैरअर्जदार यांचा वेळ 9-54 वा. फोन आला आणि त्यांनी त्यांना ग्रामपंचायतीला जाण्यास वेळ झालेला आहे, ग्रामपंचायतीला जातो तुमच्या ठरावाची सर्व कागदपत्रे तयार करून कागदपत्रे घेऊन सायंकाळपर्यंत गोंदिया येथे घरी येतो. आल्यावर तुम्हाला फोन करतो, त्यानंतर तुम्ही माझ्या घरी या असे फोनवर सांगितल्याचे आम्हास सांगितले. यावरून

गैरअर्जदार यांच्या फोनची वाट पाहत कार्यालयात सर्वजण थांबून राहिलो.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना सापळा कार्यवाही दरम्यान घेण्याच्या दक्षतेबाबत सूचना दिल्या. त्याचप्रमाणे अधिनस्त अंमलदार यांना गैरअर्जदार यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा तक्रारदार यांनी नियोजित इशारा केल्यानंतर पुढील कार्यवाहीचे कार्यालयीन मोबाईलमध्ये चित्रिकरण करावे अशा सूचना देऊन मोबाईलमध्ये 32 जीबी क्षमतेचे सँडिस्क कंपनीचे ज्याचा सिरियल क्र. 5411XV871AJY असलेला एक नवीन मेमरी कार्ड पंचसमक्ष काढण्यात येऊन मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉटमध्ये Insert केले. मोबाईल सेटिंगमध्ये जाऊन सदरचे मेमरी कार्डमध्ये पूर्वीचा कोणताही डेटा जस नसल्याची पंचांना खात्री करून दिली आणि सदरच्या मोबाईलमध्ये व्हिडिओ चित्रिकरण करण्याचे सुप्रनिचित करून चित्रिकरण करण्यास सांगितले.

त्यानंतर आमच्या सूचनावरून अधिनस्त अंमलदार यांनी प्लॅस्टिक आवरणामध्ये बंद असलेले 32 जीबी क्षमतेचे सिरियल क्र. 6242DFFKL0BR असलेला एक नवीन मेमरी कार्ड पंचसमक्ष काढून संदर्भात डिजिटल ८ हॉइस रेकॉर्डर मध्ये टाकले. ८ हॉइस रेकॉर्डर तक्रारदार व दोन्ही पंकाना दाखवून ८ हॉइस रेकॉर्डरचे इनरटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची पूर्वीची ८ हॉइस रेकॉर्डिंग फाइल नसल्याबाबत खात्री केली. ८ हॉइस रेकॉर्डर पूर्ववत करून ट्रीप सुटकेसमध्ये ठेवून दिले व सापळा कार्यवाहीची पूर्व तयारी करून कार्यालयात हजर असताना वेळ 15-39 वा. तक्रारदार यांचा गैरअर्जदार यांचा फोन येत असल्याचे सांगितल्याने त्यांना फोनचे स्पीकर सुरू करून गैरअर्जदार यांच्याशी बोलण्यास सांगितले तेव्हा गैरअर्जदार यांनी तुमचे कागदपत्रे तयार आहेत, परंतु ग्रामपंचायतचा प्रिंजर खराब असल्यामुळे व गावात लाईट नसल्याने गोंदिया येथे येऊन तिथल्या एखाद्या कफूट्रून प्रिंट काढून घरी आल्यावर तुम्हाला फोन करतो त्यानंतर घरी या असे10 pt सांगितल्याने गैरअर्जदार यांच्या फोनची वाट पाहत कार्यालयात हजर राहिलो. त्यानंतर वेळ 18-23 वा. सुमारास तक्रारदार यांना गैरअर्जदार यांचा पुन्हा फोन आला आणि त्यांनी सांगितले की तुमच्या कागदपत्रांची प्रिंट काढली आहे मात्र आता खूप वेळ झाला असून अंधार पडल्यामुळे तुम्ही उद्या सकाळी 9-00 वा. ते 9-30 वा. सुमारास रुपये 1,00,000/- घेऊन घरी या असे सांगितले. त्यामुळे गैरअर्जदार यांच्याविरुद्धची सापळा कार्यवाही दिनांक 13-10-2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवून तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथक यांना सदर कारवाईबाबत गोपनीयता बाळगण्याचे सांगून दिनांक 13-10-2026 रोजी सकाळी 8-30 वा. कार्यालयात हजर राहण्यास सांगितले. यासंबंधरच्या सविस्तर नोंदी पंचानामा क्र.2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 12-10-2026 रोजी दिलेल्या सूचनाप्रमाणे दिनांक 13-10-2026 रोजी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्य कार्यालयात हजर आहेत. दिनांक 12-10-2026 रोजीची सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्रीमती उषा पाटील यांनी तक्रारदार यांना फोन करून त्यांचे कागदपत्र घेण्यासाठी रु. 1,00,000/- घेऊन येण्यास सांगितल्यामुळे आज रोजी गैरअर्जदार या घरी हजर आहेत अगर कसे याबाबबत खात्री करून घेण्यासाठी तक्रारदार यांना त्यांच्या मोबाईलवरून गैरअर्जदार यांच्या मोबाईलवर स्पीकर सुरू करून संपर्क करण्याकस सांगितल्याने तक्रारदार यांनी वेळ 08-44 व 09-18 वा. संपर्क केला असता गैरअर्जदार यांनी फोन उचलला नाही. वेळ 09-19 वा. गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांच्या मोबाईलवर फोन करून त्यांना गोंदिया येथील राहते घरी येण्यास सांगितले. यावरून तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांससह गैरअर्जदार यांना लाच रक्कम देण्यासाठी पाठविण्याचे

ठरविण्यात आले.

त्यानंतर आमच्या सूचनावरून पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची घेतलेली अंगझडतीची वेगळी यादी तयार करून त्यावर आम्ही, दोन्ही पंकाने सह्या केल्या व तक्रारदारने हजर केलेले सामान तक्रारदारसास वेळीच परत केले.

त्यानंतर आमच्या सूचनावरून अधिनस्त अंमलदार यांनी ट्रीप सुटकेसमधून लाच रकमाचे बाहेर काढून पंच क्र. 1 यांच्याकडे दिला. पंच क्र. 1 यांनी लिफाफ्यातून लाच रक्कम बाहेर काढून तक्रारदार यांच्या फुलपँटच्या समोरील दोन्ही खिशात ठेवून दिली आणि सापळा कार्यवाही वेळी गैरअर्जदार यांनी लाच रकमाची मागणी केल्यानंतर त्यांना लाच रक्कम द्यावी, त्यापूर्वी या नोटांना हात लावू नये अशा सूचना दिल्या. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सर्व सदस्यांना तयार करण्यात आलेल्या वेगवेगळ्या पथकांची माहिती देऊन सापळा कार्यवाही वेळी आपापल्या भूमिकेसंबंधात घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचना देण्यात आल्या.

त्याचप्रमाणे अधिनस्त अंमलदार यांना सापळा कार्यवाहीचे चित्रिकरणाकरिता कार्यालयीन मोबाईल ज्यामध्ये 32 जीबी क्षमतेचा सिरियल क्र. 5411XV871AJY चा नवीन मेमरी कार्ड टाकून पूर्ववत करून ठेवलेल्या कार्यालयीन मोबाईलमध्ये सापळा कार्यवाहीचे फोटो आणि व्हिडिओ चित्रिकरण हे थेट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जप्त होणार असल्याचे सुप्रनिचित करून चित्रिकरण करण्यास सांगितले.

त्यानंतर आमच्या सूचनावरून सापळा पथकातील अंमलदार यांनी ट्रीप सुटकेसमधून पूर्ववत करून ठेवून असलेला कार्यालयीन डिजिटल ८ हॉइस रेकॉर्डर ज्यामध्ये32 जीबी क्षमतेचा सिरियल क्र. 6242DFFKL0BR चा नवीन मेमरी कार्ड टाकलेला बाहेर काढून वेळ 09-34 वा. सुरू करून त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांच्या आवाजात लाच रक्कम देण्यासाठी गैरअर्जदार यांच्याकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते ८ हॉइस रेकॉर्डर कापडी पिसाफर ठेवून तक्रारदार यांच्या गळ्यामध्ये दोरीच्या सहाय्याने शर्टच्या आत लटकवून तक्रारदार व पंच क्र. 1 यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गोंदिया येथून तक्रारदार यांच्या खाजगी मोटारसायकल क्र. MH 35/AF-4670 ने गैरअर्जदार यांना लाच रक्कम देण्यासाठी त्यांच्या राहते घरी जाण्याकरिता रवाना करण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2, सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालो आणि गैरअर्जदार यांच्या राहते घराच्या जवळील परिसरात पोहचून तक्रारदार यांच्या नियोजित इशार्याची वाट पाहत बसलो.

काही वेळाने तक्रारदार हे पंच क्र. 1 सह दर्शनीय ठिकाणी येऊन तक्रारदार यांनी आपल्या डोळ्यावरील चष्मा काढून उजव्या हातात ठेवून गैरअर्जदार यांनी त्यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित इशारा केल्यावर सापळा पथकासह गेल्यास गैरअर्जदार यांचे पती रामचंद्र ज्ञानराम मोटघरे यांनी गैरअर्जदार यांच्या इशार्यावरून लाच रक्कम स्वीकारल्याने त्यांना व गैरअर्जदार उषा पाटील यांना लाच रकमासह यांना ताब्यात घेऊन कार्यवाही केली. सदर कार्यवाहीचे मोबाईलमध्ये चित्रिकरण करण्यात आले आहे. तक्रारदार यांच्या गळ्यातील ८ हॉइस रेकॉर्डर बाहेर काढून त्यामध्ये पंच क्र. 1 यांच्या आवाजात सापळा कार्यवाही पूर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनिमुद्रित करून ८ हॉइस रेकॉर्डर09-55 वाजता बंद करण्यात आले. ८ हॉइस रेकॉर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाइल 261013_0934.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसून

आले.

सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यातील झालेले ध्वनिमुद्रित संभाषणाची स्क्रिप्ट तयार करून त्यास परिशिष्ट-ब असे शीर्षक देण्यात आले. सदर संभाषण फाइलची हॅश व हॅल्य काढून सदरचे मेमरी कार्ड हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यात ठेवून त्यावर आम्ही व दोन्ही पंकाना सह्या करून तो लिफाफा कार्यालयीन सीलने सील बंद करून ट्रीप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवून दिले. यासंबंधरच्या सविस्तर नोंदी पंचानामा क्र.3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

तरी, तक्रारदार श्री रविकांत खुशाली खिल्लारी (माजी सैनिक) रा. मु.पो. सावोली, ता. देवरी, जि. गोंदिया यांनी दिनांक 09-10-2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक 09-10-2026 रोजीच्या वेळ 12-51 वा. ते दिनांक 13-10-2026 रोजीच्या वेळ 9-55 वा. दरम्यान पंचसमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान आलेली उषा जयकृष्ण पाटील, वय 42 वर्षे, पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत मानगाव/न्हेजगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया यांनी तक्रारदार यांच्याकडे ते माजी सैनिक असल्याने त्यांनी शासनाकडून पाच एकर शेती मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांना सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भास ग्रामपंचायतचा ठराव घेऊन एनओसीचे कागदपत्र तयार करून देण्यासाठी ग्रामपंचायत सरंपच व सदस्य यांचे नाव घेऊन रु. 5,50,000/- लाचेची मागणी करून काम सुरू करण्यासाठी स्वतःसाठी वेगळे रु. 1,00,000/- लाचेची पंचसमक्ष मागणी करून ती लाच रक्कम त्यांचे पती आरोपी रामचंद्र ज्ञानराम मोटघरे, वय 54 वर्षे, पद-विषय साधन व्यक्ती, गृह साधन केंद्र, पंचायत समिती सालेकसा, ता. सालेकसा, जि. गोंदिया, मूळ पत्ता- नांगपुरा, ता. आमगाव, जि. गोंदिया, ह.मु.- श्री. रामेश्वर कटरे यांच्या घरी भाड्याने राधाकृष्ण कॉलनी छोटा गोंदिया हनुमान मंदिरजवळ यांच्या मार्फत स्वीकारून आपल्या लोकसेवक पदाचा गैरफायदा घेतला आहे म्हणून आलेली उषा जयकृष्ण पाटील, वय 42 वर्षे, पद-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत मानगाव/न्हेजगाव यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारित अधिनियम 2018) चे कलम 7 व त्यांचे पती आरोपी रामचंद्र ज्ञानराम मोटघरे, वय 54 वर्षे, पद-विषय साधन व्यक्ती, गृह साधन केंद्र, पंचायत समिती सालेकसा, ता. सालेकसा, जि. गोंदिया यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारित अधिनियम 2018) चे कलम 12 प्रमाणे गुन्हा नोंद होण्यासाठी कायदेशीर फिर्याद देत आहे.

(अरविंद राऊत)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

I.I.F.-I (एकीकृत अन्न वेषणफॉर्म - १)

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** PRAVIN DEVAJI BORKUTE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** PRAVIN DEVAJI BORKUTE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 15101000402PDBM810M

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) ) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्म मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) ) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1972 | | | | चेचक: होय |
| 2 | महिला | 1984 | | | | चेचक: होय |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्ट्ये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)